प्रेसनोट दि.१२.०१.२०२२

**शिर्षक - तक्रारदार यांनी त्यांच्या मौजे अंकलगे येथील शेतजमिनी मधुन जाणे - येण्याकरीता तसेच शेतमालाची ने आण करण्याकरीता वहीवाटी रस्ता खुला करुन मिळणेबावत तहसिलदार कोर्ट, अक्कलकोट येथे सादर केलेल्या अर्जावर सुनावणी होवुन तक्रारदार यांच्याबाजुने निकाल लावुन सदर निकालाची प्रत देण्याकरीता यातील आलोसे समाधान काळे तलाठी, सज्जा खानापुर, तहसिल अक्कलकोट यांनी २५,०००/- रुपयांची मागणी करुन त्यापैकी पहिला हप्ता २०,०००/- रुपयांची मागणी केली**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | पुणे परीक्षेत्र, सोलापूर युनिट |
| गुन्हा नोंद क्रमांक | अक्कलकोट उत्तर पो. ठाणे सोलापूर ग्रामिण, गु.र.नं. १३/२०२२ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंधकायदाकलम ७, ७ (अ) प्रमाणे. |
| आरोपीचे नाव व कार्यालय | समाधान बाळासाहेब काळे, वय ३३,वर्षे व्यवसाय नोकरी, पद तलाठी सज्जा खानापूर, तहसिल अक्कलकोट, रा समर्थ नगर, अक्कलकोट जि. सोलापूर |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | २५,०००/-रुपयांची मागणी करुन त्यापैकी पहिला हप्ता म्हणुन २०,०००/- रुपयांची मागणी केली आहे |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | निरंक |
| थोडक्यात माहिती | यात नमूद तारखेस वेळी व ठिकाणी यातील आरोपी लोकसेवक समाधान बाळासाहेब काळे यांनी दि २२/१२/२०२२ रोजी १३.२७ ते १४.३४ वा चे दरम्यान आपले लोकसेवक पदाचा दुरूपयोग करून त्यांना कायद्याने मिळावयाचे त्या खेरीज अन्य पारीतोषण म्हणून तक्रारदार त्यांच्या मौजे अंकलगे येथील शेतजमिनी मधुन जाणे - येण्याकरीता तसेच शेतमालाची ने आण करण्याकरीता वाहीवाटी रस्ता खुला करुन मिळणेबाबत त्यांनी तहसिलदार कोर्ट, अक्कलकोट यांचे कडे सादर केलेल्या अर्जावर सुनावणी होवुन वरिष्ठांकडुन त्यांच्याबाजुने निकाल लावुन सदर निकालाची प्रत देण्याकरीता २५,०००/- रु लाचेची मागणी करुन, पहिला हप्ता म्हणुन २०,०००/-रु. लाचेची मागणी करुन वैयक्तिक सांपत्तीक फायदा मिळवण्यासाठी गुन्हेगारी स्वरूपाचे वर्तन केले आहे म्हणुन समाधान बाळासाहेब काळे, वय ३३,वर्षे व्यवसाय नोकरी, पद तलाठी सज्जा अंकलगे, तहसिल अक्कलकोट, रा समर्थ नगर, अक्कलकोट जि. सोलापूर याचेविरुध्द अक्कलकोट उत्तर पो. ठाणे सोलापूर ग्रामिण येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चेकलम ७, ७ (अ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |
| सापळा पथक | सदरची कारवाई श्री. राजेश बनसोडे, पोलीस अधिक्षक, ॲन्टीकरप्शन ब्युरो, पुणे व श्री. गुरव, अपर पोलीस अधिक्षक, ॲन्टीकरप्शन ब्युरो, पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. संजीव पाटील, पोलीस उप अधिक्षक ॲन्टीकरप्शन ब्युरो, सोलापुर श्री. उमाकांत महाडिक, पोलीसनिरीक्षक, पोहवा/सोनवणे, पोना/श्रीराम घुगे, पोकॉ/उमेश पवार व पोकॉ/ स्वप्नील सण्णके सर्व नेम ॲन्टी करप्शन ब्युरो सोलापूर यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागा तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधीत काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास त्वरीत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सोलापूर कार्यालयाशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :- पोलीस उपअधिक्षक,ॲन्टीकरप्शन ब्युरो, रंगभवनचौक, सोलापूर ४१३४०३.

संकेत स्थळ :- acbmaharashtra.gov.in

ई-मेल :- acbwebmail@mahapolice.gov.in

ऑनलाईनतक्रार ॲप :- acbmaharashtra.net

टोल फ्रीक्रमांक :- १०६४

दुरध्वनीक्रमांक :- ०२१७-२३१२६६८

व्हॉटसॲप क्रमांक :- ९९३०९९७७००

पोलीस निरीक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो, सोलापूर

(उमाकांत महाडिक)
पोलीस निरीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो,सोलापूर